॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (दि. २७ ) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बौद्धिक संपदा हक्क विभागामार्फत जागतिक बौद्धिक संपदा हक्क दिनाचे औचित्य साधून आज दि.२७ एप्रिल रोजी 'कबचौउमवितील बौद्धिक संपदा' यावरील माहितीपुस्तिकेच्या प्रथम आवृत्तीचे प्रकाशन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. सोपान इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. योगेश पाटील आणि नवसंशोधन केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे हे या प्रकाशनप्रसंगी उपस्थित होते. सदर माहितीपुस्तिकेत आतापर्यंत विद्यापीठातील प्राध्यापकांना मंजूर झालेल्या तसेच मंजुरीप्रक्रियेत असलेल्या पेटंट, कॉपीराईट आणि औद्यागिक प्रारूपे यांची एकत्रित माहिती विषय आणि विभागानुसार संकलित करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बौद्धिक संपदा हक्क मिळवण्यासाठीची प्रक्रिया, त्यासाठीचे विहित नमुने, शासकीय फी इत्यादी माहिती तपशीलवार मांडण्यात आली आहे.

यावेळी बोलताना कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी म्हणाले की, विद्यापीठ व विद्यापीठ परिक्षेत्राबाहेरील संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांना नवसंशोधन करताना सदर माहितीपुस्तिकेचा बहुमूल्य उपयोग होणार असून विद्यार्थ्यांना देखील अभ्यासासाठी मदत होणार आहे. बौद्धिक संपदा विभागाचे पीठासीन प्रा. दिलीप हुंडीवाले व समन्वयक प्रा. विकास गिते यांच्या नेतृत्वात संशोधन अधिकारी डॉ. सारंग बारी, मयूर पाटील आणि नेहा पाटील यांनी या माहितीपुस्तिकेचे संपादन केले आहे.

..................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ — दिनांक: २७ एप्रिल, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता